महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदांना मुदतवाढ मिळणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मािवका-२०१६/प्र.क्र.१/का.१४१८**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक : २४ जानेवारी, २०१८**

**वाचा**
१. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: ममावि-२००६/प्र.क्र.२०/ का-१४१३, दि.२९ जून, २००६
२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविमि-२०१०/प्र.क्र.८१/ का-१४१८, दि.१९ जुलै, २०११
३. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०११/प्र.क्र.१२१/ का-१४१८, दि.११ नोव्हेंबर, २०११
४. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०११/प्र.क्र.१२१/ का-१४१८, दि.२४ जानेवारी, २०१३
५. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१३/प्र.क्र.१२३/ का-१४१८, दि.३० जून, २०१४
६. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१४/प्र.क्र.६४/ का-१४१८, दि.२७ ऑगस्ट, २०१४
७. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१६/प्र.क्र.१/ का-१४१८, दि.१ मार्च, २०१६
८. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१६/प्र.क्र.१/ का-१४१८, दि.१ मार्च, २०१७
९. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१६/प्र.क्र.१/ का-१४१८, दि.३० ऑक्टोबर, २०१७
१०. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र: पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आ. पु.क., दि.८ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना :**

राज्यातील २२ जिल्ह्यातील अति मागास १२५ तालुक्यांत मानव विकास कार्यक्रम सन २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ या बाबींशी संबंधित विविध योजना निवडलेल्या तालुक्यांत राबविण्यात येत आहेत. मानव विकास कार्यक्रमाचे राज्यस्तरावरील संनियंत्रण करण्यासाठी मानव विकास आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली असून सदर आयुक्तालयामध्ये संदर्भिय क्र.(१) अन्वये एकूण ११ पदे निर्माण करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, मानव विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भिय क्र.(३) अन्वये २२ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी-१; संशोधन सहाय्यक-१ व सांख्यिकी सहाय्यक-१ याप्रमाणे प्रत्येकी ३ पदे तसेच ज्या जिल्ह्यातील ४ किंवा त्यापेक्षा अधिक तालुक्यांचा मानव विकास कार्यक्रमामध्ये समावेश आहे अशा १५ जिल्ह्यात जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) यांचे प्रत्येकी एक पद अशी एकूण ८१ पदे निर्माण करण्यात आली आहेत. शासन निर्णय, नियोजन विभाग, दि. ३० जून, २०१४ अन्वये सदर कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदांची पूनर्रचना करण्यात आलेली आहे.

२. तसेच उपरोक्त संदर्भिय क्र.(६) अन्वये ठाणे जिल्ह्यातील जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) हे एक पद कमी करुन नवनिर्मित पालघर जिल्ह्यासाठी वर्ग करण्यात येवून सहायक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)-१, संशोधन सहायक-१ व साख्यिकी सहायक-१ अशी ३ पदे पालघर जिल्ह्यासाठी नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत.

३. उपरोक्त संदर्भिय क्र.(९) अन्वये मानव विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने निर्माण करण्यात आलेल्या खालीलप्रमाणे एकूण ९५ पदांना सदर कार्यक्रम चालू असेपर्यंत किंवा अधिकतम दि. ३१ डिसेंबर,२०१७ पर्यंत सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. आता यापुढे सदर पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | पदनाम | मानव विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर पदांचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आयुक्तालय | जिल्हास्तरीय | नियोजन विभाग | **एकूण** |
| १ | आयुक्त | १ | ० | ० | १ |
| २ | उप आयुक्त | १ | ० | ० | १ |
| ३ | लेखाधिकारी | १ | ० | ० | १ |
| ४ | लघुलेखक | १ | ० | ० | १ |
| ५ | जिल्हा नियोजन अधिकारी/सहायक आयुक्त | १ | १५ | ० | १६ |
| ६ | सहायक जिल्हा नियोजन अधिकारी | २ | २० | १ | २३ |
| ७ | संशोधन सहायक | २ | २० | १ | २३ |
| ८ | सांख्यिकी सहायक | २ | २३ | ० | २५ |
| ९ | लिपिक | २ | ० | ० | २ |
| १० | शिपाई | २ | ० | ० | २ |
| | **एकूण** | **१५** | **७८** | **२** | **९५** |

**शासन निर्णय:**

वित्त विभाग, शासन निर्णय, क्र: पदनि-२०१६/ प्र.क्र. ०८/१६/आ.पु.क., दि.०८ जानेवारी, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मानव विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेली वरील ९५ पदे ही दि. २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांचा सविस्तर तपशील **परिशिष्ट -(अ)** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर मुदतवाढ दिलेल्या पदांवरील खर्च मागणी क्रमांक ओ-१, २०५३ जिल्हा प्रशासन,०९३ जिल्हा आस्थापना, पंचवार्षिक योजनाअंर्तगत योजना, ०४ आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांक वृद्धी करणे (२०५३ १२३१) दत्तमत या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक **२०१८०१२४१२४१५३३२१६** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e350 48adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.01.25 11:36:36 +05'30'

**(वि.फ.वसावे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
५. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
७. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
८. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
९. आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
१०. उपसचिव (का. १४२६/१४२७), नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
११. विभागीय आयुक्त, (सर्व)
१२. जिल्हाधिकारी, (सर्व)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,(सर्व)
१४. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. उपायुक्त(नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
१८. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१९. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
२०. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव
२१. निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

*************

# परिशिष्ट- (अ)

## मानव विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदांचा तपशील

| अ.क्र. | पदे / कार्यालय | आयुक्त | उपायुक्त/ सह संचालक | सहायक आयुक्त / जिल्हा नियोजन अधिकारी | लेखा अधिकारी | सहायक जिल्हा नियोजन अधिकारी | लघु-लेखक | संशोधन सहायक | सांख्यिकी सहायक | लिपिक | शिपाई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | पालघर | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **२** | ठाणे | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ३ |
| **३** | रायगड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ |
| **४** | सिंधुदुर्ग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ |
| **५** | नाशिक | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **६** | धुळे | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **७** | नंदूरबार | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **८** | जळगाव | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **९** | जालना | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **१०** | परभणी | -- | -- | १ | -- | १ | -- | २ | १ | -- | -- | ५ |
| **११** | हिंगोली | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | -- | २ |
| **१२** | बीड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ |
| **१३** | नांदेड | -- | -- | १ | -- | १ | -- | २ | १ | -- | -- | ५ |
| **१४** | बुलढाणा | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **१५** | अकोला | -- | -- | -- | -- | -- | -- |  | १ | -- | -- | १ |
| **१६** | वाशिम | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **१७** | अमरावती | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | -- | २ |
| **१८** | यवतमाळ | -- | -- | १ | -- | २ | -- | १ | १ | -- | -- | ५ |
| **१९** | नागपूर | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | -- | २ |
| **२०** | भंडारा | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **२१** | गोंदिया | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | -- | ४ |
| **२२** | चंद्रपूर | -- | -- | १ | -- | २ | -- | १ | १ | -- | -- | ५ |
| **२३** | गडचिरोली | -- | -- | १ | -- | २ | -- | १ | १ | -- | -- | ५ |
| **२४** | आयुक्तालय | १ | १ | १ | १ | २ | १ | २ | २ | २ | २ | १५ |
| **२५** | नियोजन विभाग | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | -- | २ |
|  | एकूण पदे | **१** | **१** | **१६** | **१** | **२३** | **१** | **२३** | **२५** | **२** | **२** | **९५** |